राष्ट्रीय सेवा योजना
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक,
**कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,**
उत्तमनगर, सिडको, नाशिक – ४२२००८

राष्ट्रीय सेवा योजना

नियमित उपक्रम अहवाल

मार्च २०२२

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२

१. मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक, कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, उत्तमनगर, सिडको, नाशिक – ४२२००८
२. प्राचार्य डॉ. जे.डी.सोनखासकार , मो.९४२२२५६७५८
३. कार्यक्रम अधिकारी डॉ.आर.ए.आहिरे , मो.९८८१९७८१०९
४. स्वयंसेवक एकूण संख्या (एकूण युनिट)- २५० दोनशे पन्नास
५. कार्यशाळा शिबीर व्याख्याने इ. आयोजनात सहभागी संस्था
    १. नंदिनी संवर्धन मोहीम नाशिक
    २. ग्रामपंचायत गिरणारे
    ३. जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रक विभाग नाशिक
    ४. यश फाउंडेशन नाशिक

**मराठा विद्या प्रसारक समाजाचे,**
**कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय,**
**उत्तमनगर सिडको, नाशिक- ४२२००८**


---

# नियमित उपक्रम अहवाल २०२१ -२०२२

**माहे जून २०२१ –**

दि. २१ जून २०२१ रोजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने योग दिवस साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेतील महाविद्यालयतील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक कु. ज्योत्स्ना कदम हिने ऑनलाईन व्हिडियो मार्फत जनजागृती केली.



महाविद्यालयाच्यावतीने कोव्हीड १९ जनजागृती मोहिमेंतर्गत पोस्टर-व्हिडियोद्वारे राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी जनजागृती करण्याचे काम केले.

**माहे जूलै २०२१ –**

जुलै २०२१ या कालावधीत महाविद्यालयातील स्वयंसेविका कु. ज्योत्सना कदम व भारती पाटील यांनी सिडको विभागातील लसीकरण केंद्रांवर कोव्हीड १९ लसीकरण मोहिमेत सक्रीय सहभाग नोंदविला तसेच जिल्हा समन्वयक डॉ.रविंद्र आहिरे यांनी नाशिक महानगरपालिका व सेव्ह द चिल्ड्रन या संस्थेसोबत नाशिक शहरात कोव्हीड १९ लसीकरण मोहीम यशस्वीपणे राबविली त्यासाठी त्यांचा मा.आयुक्त श्री. कैलास जाधव याच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.






टोकियो-2020 ऑलम्पिक मध्ये सहभागी होणाऱ्या भारतीय ऑलम्पिक संघाला शुभेच्छा देण्यासाठी महाविद्यालयात सेल्फी कॉर्नर व पोस्टर-व्हिडियोद्वारे शुभेच्छा दिल्या.






नाशिक महानगरपालिका व सेव्ह द चिल्ड्रन या संस्थेसोबत नाशिक शहरात कोव्हीड १९ लसीकरण मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी महाविद्यालय, नाशिक महानगरपालिका व सेव्ह द चिल्ड्रन यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन मिटिंग घेण्यात आली.






**माहे ऑगस्ट २०२१ –**

दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत महाविद्यालयातील 'स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान पंधरवाडा' साजरा करण्यात आला या पंधरवाड्या निमित्त महाविद्यालयात तसेच महाविद्यालयीन परिसरात वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्वच्छता पर जनजागृती स्वच्छता सर्वेक्षण इत्यादी उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमात रा.से.योजनेचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांनी उत्सपुर्तपणे सहभाग नोंदविला, तसेच महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्यांनी स्वच्छता अभियानासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

**माहे सप्टेंबर २०२१ –**

दि. १६ सप्टेंबर २०२१ रोजी जिल्हास्तरीय SRD-NRD निवड चाचणी शिबिर सिडको महाविद्यालय, नाशिक येथे आयोजित करण्यात आले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील कु.शायना खान, कु.स्वप्रासिद्धी शिरसाठ या स्वयंसेविकानी सहभाग नोंदविला.





या निवड चाचणी शिबिरात निवड होऊन दि. २२ सप्टेंबर २०२१ रोजी विद्यापीठ/ राज्यस्तरीय  निवड चाचणी शिबिरात कु.शायना खान, कु.स्वप्नासिद्धी शिरसाठ या स्वयंसेविकानी सहभाग नोंदविला. विद्यापीठाच्यावतीने कु. ज्योत्सना कदम हिने समुपदेशक व जिल्हा समन्वयक डॉ. रविंद्र आहिरे यांनी परीक्षक म्हणून काम पहिले.


दि. १९ सप्टेंबर २०२१  रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नाशिक महानगरपालिका आयोजित 'गणेश मूर्ती दान' या उपक्रमात सहभाग नोंदवून गणेश विसर्जनाच्या दिवशी गणेश मूर्तींचे विसर्जन न करता ती दान करावी पर्यावरणाच्या संवर्धन करावे. याची जनजागृती करत, गणेश मूर्ती संकलनामध्ये रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी व सर्व स्वयंसेवकांनी दर वर्षी प्रमाणे आपले योगदान दिले. या उपक्रमामध्ये महाविद्यालयचे सातत्य आणि केलेल्या उत्कृष्ट कार्यामुळे महाविद्यालयाचे कौतुक  करण्यात आले.








दि. २४  सप्टेंबर २०२१ राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन साजरा करण्यात आला व  त्यानिमित्ताने महाविद्यालयामार्फत ऑनलाईन प्रबोधन कार्यशाळा आयोजित करण्यात आली त्यासाठी डॉ. प्रभाकर देसाई, राज्यसंपर्क अधिकारी तथा संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व माजी जिल्हा समन्वयक प्रा.एस.टी.घुले सरयांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.






**माहे ऑक्टोबर २०२१ –**

२ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधीजींची १५० वी जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली, या प्रसंगी प्रा. सोमनाथ घुले सरांनी मार्गदर्शन केले तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी स्वच्छतेविषयी माहिती सांगून महात्मा गांधीजींची जयंती संपन्न झाली. नंदिनी नदी, उंटवाडी येथे स्वच्छता मोहीम राबविली परिसरात प्लास्टिक, घनकचरा संकलन करून विल्हेवाट करण्यात आली या उपक्रमात निसर्ग संवर्धन संस्था, नाशिक महानगरपालिका, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.





३१ ऑक्टोबर रोजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला या दिवशी विद्यार्थ्यांनी एकता दौडमध्ये सहभाग घेऊन एकतेची शपथ घेतली.

**माहे नोव्हेंबर २०२१ –**

दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी महाविद्यालात 'संविधान दिन' साजरा करण्यात आला यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. डी. सोनखासकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षीय पद भूषविले व प्रमुख वक्ते डॉ. पी.डी.देवरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.








## माहे डिसेंबर २०२१ –

१ डिसेंबर रोजी जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रक विभाग नाशिक यांच्या वतीने ऑनलाईन पोस्टर व व्हिडियोद्वारे राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी जनजागृती करण्याचे काम केले. New India@75 अंतर्गत विविध स्पर्धा घेऊन पारितोषिके देण्यात आली.

## माहे जानेवारी २०२२ –


दि. ०६ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व महिंद्रा राईज यांच्या संयुक्त विद्यमाने Safe Rider या विषयावर ऑनलाईन प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.




दि. ३ जानेवारी २०२२ रोजी सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता जिजामाता यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रसंगी प्रा.सोमनाथ घुले सर यांनी मार्गदर्शन केले.

दि. २५ जानेवारी २०२२ राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला त्याप्रसंगी विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली.








दि. २५  जानेवारी ते ३१ जानेवारी २०२२ दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले त्यात १२५ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. विविध उपक्रमांच्या माध्यमातून या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन पार पडले व ३१ जानेवारी २०२२ रोजी समारोप करण्यात आला.

दि. १२ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयातील रासेयोच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन व्हिडियो कॉन्फरन्स मार्फत राष्ट्रीय युवा महोस्तव या सहभाग नोंदविला.

**माहे फेब्रुवारी २०२२ –**

दि. १५/०२/२०२२ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना, महर्षी कर्वे शिक्षण संस्थेचे बाया स्त्री अभ्यास केंद्र,पुणे व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय लिंग भाव संवेदिकरण जाणीव जागृती अभियान एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.






**माहे मार्च २०२२ –**

१० मार्च २०२२ रोजी 'जागतिक महिला दिन्नानिमित्त' महाविद्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे वर्षभर आयोजित या नियमित कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी डॉ.रविंद्र आहिरे, प्रा. वर्षा शिरोरे , प्रा शुभम गव्हाणे यांनी उत्सफुर्तपणे सहभाग घेतला तसेच प्रा. सोमनाथ घुले सरांचे विशेष मार्गदर्शन लाभले, या सर्व नियमित कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे आदरणीय

प्राचार्या डॉ. जे.डी.सोनखासकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच स्वयंसेवकांच्या उत्तम प्रतिसादामुळे सन २०२१-२०२२ वर्षातील सर्व नियमित कार्यक्रम उत्तमरीतीने पार पडले.

**डायबिटीस व शुगर तपासणी तपासणी** एकूण सहभागी संख्या- १25
वृक्षरोपण एकूण संख्या- १५८
सहभागी स्वयंसेवक- २५०

**(डॉ.रविंद्र आहिरे )**
**रा.से.यो**
**कार्यक्रम अधिकारी**

**(डॉ. जे.डी.सोनखासकर)**
**प्राचार्य**